मूल्यवर्धन : छोट्या छोट्या शेतांचे महत्त्व वाढवणे

Anithakumari P.

सोप्या पद्धतीद्वारे मूल्यवर्धन साध्य करता येते. सहकार्य, समन्वय, अभिसरण, समुदायांची सर्वसमावेशकता आणि प्रीमियर रिसर्च इन्स्टिट्यूटला हाताशी धरल्याने यश मिळू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे केरळमधील पथियूर पंचायत क्षेत्रात झालेला सामाजिक नवीन उपक्रम!



अनेक वर्षांच्या खंडानंतर सिसमेम पुन्हा जीवित झाले.

जगाच्या एकूण ७०.८० टक्के शेतजमिनीतून कौटुंबिक शेतीचा हिस्सा हा ऐशी टक्के अन्नाचे उत्पादन करीत आहे. २०५० पर्यंत अन्नधान्य उत्पादन दर वर्षी ३३० मेट्रिक टन वाढण्याची गरज आहे. लहान कौटुंबिक शेती पर्यावरणपूरक असतात तसेच अन्न सुरक्षा आणि पोषणमूल्यांमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी मोठी भूमिका बजावतात.

केरळ राज्यात सरासरी शेतजमीन आकार आहे फक्त ०.२ हेक्टर!, बहुतांश त्या नारळाची लागवड केलेली परसदारे आहेत. त्यामुळे लहान शेतकऱ्यांसमोरील सर्वात मोठे आव्हान हे या बागांना नफ्यात कसे आणायचे हा आहे. येथील इंडियन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रिसर्च सेन्ट्रल प्लान्टेशन क्रॉप्स रिसर्च इस्टीट्युट, कायमकुलम यांनी मिळून २०१६ पासून प्रोत्साहन दिलेला ''फार्मर फर्स्ट प्रोग्राम'' (FFP) पठियूर पंचायत येथे सुरू केला. तेव्हा त्याचा मुख्य उद्देश हा तंत्रज्ञान जुळवून घेऊन शेतीचे जीवनमान आणि उत्पन्न सुधारणे हा होता. पिकामधे हस्तक्षेप करून फलोत्पादन, पशुधन, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, मूल्यवर्धन, इ. बाबत १००० शेतकरी कुटुंबांमध्ये एकात्मिक कृषी व्यवस्था या मार्फत हे करण्याचा प्रयत्न केला. हस्तक्षेपांच्या संक्षिप्त टाउमलाइनमध्ये रॅपिड ग्रामीण विश्लेषण आणि त्यानंतर सहभागी ग्रामीण विश्लेषण (PRA), ७५० नमुन्यांमधील औपचारिक पूर्व प्रकल्प सर्वेक्षण प्रतिसादकर्ते, फोकस ग्रुप डिस्कशन (FFP) प्रभाग प्रतिनिधींचा समावेश असलेले १९ प्रभाग आणि भागधारक यांचा समावेश करण्यात आला. समस्यांना प्राधान्य देण्यासाठी धोरणे तयार करण्यात आली. २०१६ मध्ये हे पूर्ण करण्यात आले.

पुढील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी धोरणे तयार करण्यात आली. शेताचा लहान आकार/नारळाच्या बागा, शेतीची बदलती सामाजिक आणि आर्थिक गणिते, उत्पादनाचे अनेक प्रश्न. तसेच, इतर घटक आणि समाविष्ट आव्हाने याशिवाय लहान शेतकऱ्यांपर्यंत विस्तार शिक्षण न पोहोचणे विशेषत: महिला शेतकरी, शेतकऱ्यांना कमी संसाधने उपलब्ध आणि कमी उत्पन्न हे सर्व बघता एक उपयुक्त उपाय म्हणजे मूल्यवर्धन असे लक्षात आले. परंतु अर्थातच मूल्यवर्धन म्हणजे नेमके काय करणार, त्याची व्याप्ती, आखणी, विकास, त्याला जनताभिमुख करणे. काढणीपश्चात तसेच प्रक्रिया व्यवस्था यामध्ये महिलांचा सहभाग यामुळे कुटुंबाच्या व एकंदर समाजाच्या आर्थिक योगदानामध्ये महिला योगदान देऊ शकल्या. विशेषत: पंचायतीच्या लहान शेतकऱ्यांसाठी आवश्यक होते.

परिस्थितीजन्य अभ्यास आणि विश्लेषणामध्ये शेती सदस्य आणि पंचायत स्थानिक संस्था, नारळ उत्पादक महिला शेतकरी संघटना, एसएचजी, महिला शेतकरी, मनरेगा मजूर, पशुधन आणि कुक्कुटपालन करणारे शेतकरी व ग्रामीण युवकांचा सहभाग होता. विश्लेषणात पुनरुच्चार केला आहे की लहान शेतकऱ्यांच्या बहुआयामी पैलू, उत्पादन प्रणालीकडे पुरेसे लक्ष दिले जात नव्हते.

संभाव्य हस्तक्षेपांची रचना केली गेली ज्यामध्ये चांगल्या जातींद्वारे उत्पादकता सुधारणे आणि प्राधान्यकृत पीक पद्धती, अधिक चांगल्या पद्धतीच्या कृषी पद्धतीचा अवलंब, शेत तलावांचे/तळ्यांचे पुनरुज्जीवन, अधिक चांगल्या पद्धतीचे प्रोसेसिंग आणि विक्री प्रयत्न याबाबी समाविष्ट आहेत. पुढील गोष्टींचा उल्लेख अति महत्त्वाचा म्हणून मांडण्यात आला. मूल्यवर्धनाची उणीव/नियोजित विपणन/विक्री व्यवस्था/कामगारांची चढती मजुरी/महागडे संसाधन विखुरलेली छोटी छोटी शेते घरगुती बागांचे निवासी प्लॉटमध्ये रूपांतरण इत्यादी.

सुरुवातीला घरगुती पातळीवर शेतीचे नियोजन करण्यात आले. त्यात शेतकऱ्यांना रेखांकन/नकाशा काढण्यासाठी, सक्षम करण्यासाठी सध्याची परिस्थिती दर्शवणारे त्यांचे घराचे भूखंड, पिके, एकात्मिक शेती घटक, पाणवठे, जमीन, मातीचा प्रकार, सध्याची करण्यात येणारी गुंतवणूक, नफा/तोटा सध्या साकार होत आहे. या सर्व बाबी लक्षात आणे हा हेतू होता. यामध्ये पुढील पैलूचे दस्तऐवजीकरण करण्यात आले. पिकांचे उत्पादन, नारळ उत्पादनाच्या विशेष संदर्भासह, विशेष पुनर्वापर, संसाधनांचे स्तर, सल्लागार सेवांची उपलब्धता, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मूल्यवर्धनासंबंधित समर्थन, मूल्यवर्धन मधील अडचणी व एकंदर दृष्टी इ.

काढणीपश्चात तसेच प्रक्रिया व्यवस्था या मध्ये महिलांचा सहभाग यामुळे कुटूंबाच्या व एकंदर समाजाच्या आर्थिक योगदानामध्ये महिला योगदान देऊ शकल्या

श्रीमती राधाकुमारी, सभापती, समाज विकास सोसायटी (CDS), वॉर्ड-१ या अभिमानास्पद सहभागी आहेत आणि गट शेतीत पुढाकार घेत आहेत. आम्ही सर्व खूप प्रेरित झालो आहोत. फार्मर फर्स्ट प्रोग्राम यांच्यामुळे आम्हाला खूप आत्मविश्वास मिळाला आहे. गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने आम्हाला तीळाच्या लागवडीला यश आले आहे आणि भात शेतीचे आम्ही पुनरुज्जीवन केले आहे. सर्वोच्च उत्पादन मिळवणाऱ्या सर्वोत्तम शेतकऱ्यांपैकी एक म्हणून आम्हाला मान मिळाला आहे. १९ प्रभागातील ६८ महिला गटांमध्ये आम्ही ५०० किलो पर हेक्टर इतके उत्पादन करू शकलो. याबरोबरच आम्ही सेंद्रिय शेतीतही प्रावीण्य मिळवले. कंद, कडधान्य, मसाले, भाजीपाला, बाजरी, चारा आणि इतर पिके याबाबत आम्ही बरीच प्रगती केली. आम्ही साधारणपणे हंगामामध्ये दहा हजार ते बारा हजार प्रति महिला इतका परतावा मिळवला. यासोबतच मनरेगाच्या कडून मजुरी मिळतेच. म्हणजेच हा परतावा आम्हाला अतिरिक्त म्हणूनच असतो. ताज्या उत्पादनांनी आम्हाला आमच्या कुटुंबाच्या आहारात योगदान दिले आहे. त्याशिवाय विक्री योग्य असा भाव देखील दिलेला आहे. यामुळे कुटुंबाला आमचा महत्त्वाचा आधार मिळतो आणि त्यामुळेच आमच्या मुलांसह कुटुंबातील इतर सदस्यांनी देखील या उपक्रमात भाग घेतला. विशेषतः कोविड कालावधीमध्ये शेतीच्या बाबतीत विशेष सहभागी झाले. खरे मूल्यवर्धन म्हणजे आमच्या जीवनात आम्ही शेतकरी, व्यावसायिक कमावत्या म्हणून ओळखल्या जाऊ लागलो. आमच्या वयाची पर्वा न करता आम्ही महिला शेतकरी म्हणून उदयास आलो.

अभिसरण आणि एकत्रीकरण

एक हेक्टर जमिनीच्या मागे ४ ते १० कुटुंबापर्यंत पोहोचू शकलो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा प्रसार झाला आणि सामाजिक संस्थांचे एकत्रीकरण मजबूत आणि हेतूपूर्ण झाले. स्थानिक स्वराज्य संस्थानी देखील विस्तारित पाठिंबा दिला आणि प्रभाग सदस्यांच्या सहभागाने स्थानिक सर्व १९ वॉर्डामध्ये समाज एकत्र करण्याचे सह अभिसरण होते. मनरेगाने अन्न सुरक्षाच्या दिशेने अभिसरण स्वीकारले.

डॉ. माधुरी, पशुवैद्यकीय दवाखान्याच्या पशुवैद्यकीय सर्जन यांनी कुक्कुटपालन आणि पशुधनमध्ये मार्गदर्शन केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्याने हे प्रोजेक्ट करण्यात आले. मोठ्या प्रमाणात लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये नियोजित आणि केंद्रित हस्तक्षेपांसाठी संशोधन आणि यासाठी तांत्रिक प्रयोग आणि नवकल्पना जलद आणि परिणामकारक होण्यासाठी मदत झाली. मोठ्या प्रमाणात महिला शेतकरी मनरेगा कामगार म्हणून तसेच महिलांच्या प्रभाग सदस्य नेतृत्वातून तसेच महिला शेतकरी म्हणून

काम करताना व सहभागी होताना दिसू लागले. शेवटी श्रम, वेळ, जमीन आणि एकत्रीकरण, ज्ञान हे ($e+$e+Pe) चे विशेषता: कमी जमीन असलेल्या महिला शेतकऱ्यासाठी विशेष योगदान होते.

अगदी कमी जमीनधारणा (४ ते ६ गुंठे) असलेल्या महिलांना त्यांच्या गटामध्ये एकत्र करणे आवश्यक होते. त्यामुळे विक्रीसाठी पुरेसा माल उपलब्ध राहणे, वाटाघाटी करण्याची ताकत वाढणे व महिला शेतकऱ्यांची मोठी संख्या हे फायदे झाले. सामूहिक समज व संमतीमुळे सरकारी व सार्वजनिक जागा देखील यामध्ये घेता आल्या. जसे की मंदिराची जागा, सरकारी कार्यालयाच्या जागा इ. अशा छोट्या-छोट्या जमिनीच्या तुकड्यांना एकत्र करून किमान १ ते २ एकर सलग जमिनीत उत्पादने घेणे शक्य झाले. अशाप्रकारे सुमारे २५० हेक्टर पडीक जमिनीत सुद्धा उत्पादने घेणे शक्य झाले.

विशिष्ट पीक आणि मूल्यवर्धन म्हणून तीळाची निवड

पंचायतमध्ये सहभागी तत्वावर या कार्यक्रमाची सुरवात पाण्याची बचत करू शकणारी पोषक तत्वांनी समृद्ध असणारी व हवामानाचे बदल सहन करणारी पिके जसे रागी, कडधान्ये, मका, सूर्यफुल आणि भुईमूग या पिकांच्या प्रयोगाद्वारे झाली.

श्री. सी.के. उन्नीथन, अध्यक्ष नारळ उत्पादक सोसायटी, प्रभाग १६, पथियूर पंचायत यांनी मत व्यक्त केले की, आजच्या शेतीमध्ये लहान आणि अल्पभूधारक शेतकरी समुदायांसाठी मजुरांची कमतरता आणि कमी उत्पादकता यावर मात करण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित योग्य साधने आणि यंत्रांची निवड ही सल्ला सेवाइतकीच महत्त्वाची आहे. उत्पादकता वाढवण्यासाठी यांत्रिकीकरण, आयसीटी आणि ज्ञानावर आधारित नवकल्पनांच्या माध्यमातून मूल्यवर्धित सेवा आवश्यक आहेत.

१९ प्रभागांमध्ये २४८ महिला बचत गटांना सहभागी करून पिकांच्या १६ वाणांना सहभागी प्रयोग आणि मूल्यमापन अंतर्गत आणण्यात आले. यानंतर हे मूल्यमापन एक सामाजिक प्रक्रिया म्हणून करण्यात आले. ज्यामध्ये सहभागी शेतकरी, सामान्य जनता आणि भारतीय कृषी संशोधन परिषद केंद्रीय प्लांटेशन पीक संशोधन संस्था आणि संबंधित एजन्सी, संस्थांचे संशोधक यांचा समावेश होता. सूर्यफुल हे पीक योग्य नाही म्हणून मूल्यांकनातून निष्पन्न झाले आणि लावणे बंद केले गेले. तीळ आणि रागी ही कमी संसाधनाची गरज, पोषक उत्पादन, जास्त मागणी, कीड आणि रोगांचा कमी प्रादुर्भाव या बाबींमुळे सर्वाधिक स्वीकारलेली पिके म्हणून उदयास आली. तसेच २५० हेक्टरवर विस्तृत लागवडीमुळे कार्बन उत्सर्जन सक्षम करण्यासाठी मातीत पोषक तत्त्वे व पिकांचे अवशेष टाकण्यास मदत झाली.

तीळ हे 'ओनाड्डूकारा माती वालुकामय चिकनमाती पट्ट्यातील' पारंपारिक पीक आहे. भातानंतरचे दुसरे पीक म्हणून भाताच्या शेतात पारंपारिकपणे त्याची लागवड केली जाते. प्रकल्पपूर्व सर्वेक्षणात असे दिसून आले की तीळ (जे लवकरच भौगोलिक गुणांक पीक म्हणून घोषित केले जाईल) आणि भात ही पंचातीमध्ये सर्वाधिक बंद झालेली पिके होती. अशाप्रकारे तीळ पिकाचे पुनरुज्जीवन हे मूल्यवर्धन विस्तार धोरणाचा भाग म्हणून सर्वात यशस्वी मूल्यवर्धन हस्तक्षेप होता.

सुरवातीला २०१६ मध्ये २.०४ एकर क्षेत्रापासून सुरुवात करून महिला गटांनी सलग वर्षांमध्ये हे क्षेत्र १८८ एकरपर्यंत वाढविले. कायमकुलम-१ आणि थिलक यांना ६८ गटांनी १९ ठिकाणी केलेल्या मूल्यांकनाच्या आधारे पसंती देण्यात आली. मूल्यांकनात असे दिसून आले की, कायामकुलम-१ मध्ये तेलाचे प्रमाण ४६-४८ टक्के, थिलकमध्ये ३८ टक्के आणि इतर जातींमध्ये तेलाचे प्रमाण कमी होते. या दोन्ही जातींमध्ये फिलोडी रोगाला प्रतिकारक असून त्यामध्ये या रोगाची लागण फार कमी आढळते. ज्यामुळे पिकांचे नुकसान होते. अशाप्रकारे महिला गटांनी पीक वाण निवडण्यासाठी स्वत:ची क्षमता निर्माण केली जी त्यांच्या गरजा व स्थानिक परिस्थितीला अनुकूल होती.

मुख्य पीक म्हणून ५ ते ८ टनापर्यंत स्थानिक तीळाच्या वाणाचे उत्पादन होते. त्याची चांगली मागणी असून त्याला २५०-३०० रुपये प्रती किलो हा दर मिळतो. ताजे तीळ हे साफ व पॅक करून पंचायतमध्ये तसेच आजूबाजूच्या पंचायतींमध्ये विकल्या जाते. 'पाथीयूर करशाका ऐल्लेना' म्हणजे पाथीयूर शेतकऱ्यांचे तीळाचे तेल या नावाने ९०० ते १००० रुपये प्रती लिटर या भावाने हे तेल विकले जाते.

एका तरुण उद्योजकासाठी या कार्यक्रमांतर्गत तेल काढण्याची सुविधा स्थापन केल्याने संस्थात्मक व्यवस्थेत तीळ खरेदी करण्याचा मार्ग मोकळा झाला. महिला शेतकरी तीळाच्या लागवडीत स्थानिक तज्ज्ञ म्हणून उदयास आल्या आहेत. काढणीनंतरच्या तसेच प्रक्रिया व्यवस्थेमुळे महिला शेतकरी समाज आणि कुटुंबासाठी आर्थिक योगदान देणारे ठरल्या. एक ठोस मूल्यवर्धन हे 'शेतकरी ते शेतकरी' ज्ञानाचा प्रसार करण्यास प्रभावी व उपयुक्त ठरले.

महिला शेतकऱ्यांना शेतीची माहिती, वाढीचे टप्पे, कीड व रोगांचा कालावधी, उत्पादन, आलेल्या समस्या इत्यादींची माहिती कृषी दैनंदिनीतील लिहिण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. व्हॉटस्ॲप ग्रुपद्वारे अनुभवांची, शास्त्रज्ञ व सहकारी शेतकऱ्यांनी सुचविलेले उपाय तसेच त्यांचे यश, चित्रे, व्हिडीओ, संदेश आणि ब्रॉडकास्ट यांचे व्यापक देवाणघेवाण करणे शक्य झाले. संपूर्ण मूल्यवर्धन प्रक्रियेची धडाडीची गतिशीलता जाणीवपूर्वक स्वत:हून बाहेर आणली गेली. साध्या आयसीटी साधनांचा वापर केल्याने त्यांना वेळेचे चांगले व्यवस्थापन करणे, तंत्रज्ञानाचा प्रसार वाढविणे, पिकांचे नुकसान कमी करणे याशिवाय त्यांना परस्पर सक्षम करणे शक्य झाले.

नारळ व इतर उत्पादने मूल्यवर्धन

ग्रामीण जीवन हे दैनंदिन जीवन, वागणूक, पोशाख, सामाजिक संबंध, पर्यावरणीय मित्रत्व इत्यादीच्या दृष्टीने साधे आहे. समाजाच्या पिढीच्या अनुभवात्मक शिक्षणामुळे साध्या नवकल्पनांच्या संदर्भात साधेपणा सहज समजला जातो. एक उल्लेखनीय सफलता म्हणजे शेतकऱ्यांद्वारे २०१९ पासून शेतकरी उत्पादक कंपनी तयार करून तिचे सक्रिय प्राथमिक कार्य सुरू झाले. शेतकऱ्यांकडून ताजा शेतमाल घेण्यामुळे शेतकऱ्यांमध्ये खूप उत्साह निर्मित झाला. ज्यामध्ये कोप्रा (खोबरे), हळद आणि कंद यांचा समावेश होता. एफएफपी नाबार्ड ओडानंद फार्मर प्रोड्युसर कंपनी ली द्वारे आलेली आव्हाने व त्यातून त्यांनी काढलेला मार्ग हे खाली अधोरेखित केले आहेत.

नारळ, तीळ आणि हळद यांचे उत्पादन विक्री योग्य अधिशेष पातळीवर वाढवून मूल्यवर्धन सुरू करण्यात आले. मूल्यवर्धन योग्य वेळी काढणीइतके सोपे असू शकते. नारळ पिकामध्ये प्रभावी विपणनासाठी नारळाची काढणी फळधारणेपासून सातव्या महिन्यात करावी. कंपनी खोबऱ्याची एकसमानता आणि दर्जेदार कोरडेपणा सुनिश्चित करू शकली नाही. शेतकऱ्यांद्वारे प्रथम कार्यक्रमाची सुरवात ३५००–४००० रुपये किंमतीच्या खोबऱ्याच्या ओलावा मोजण्याच्या मशीन घेण्याने झाली. दर्जेदार खोबऱ्यासाठी ६ टक्के ओलावा सुनिश्चित करून खरेदी प्रक्रिया अंतिम करण्यात आली. ते खोबऱ्याचा कप घेऊन त्यात प्रोब टाकून आलेल्या नोंदीनुसार ओलाव्याची खात्री करू शकतात.

नंतर नारळ तेल युनिट, दोन व्हर्जिन नारळ तेल (व्हीसीओ) आणि नारळ आधारित अन्न उत्पादन युनिट आणि एक हळद बायलर, डायर आणि पावडरिंग युनिट एक एफएफसीमध्ये स्थापित केले गेले. सध्या नारळाचे प्रमाणे २५००० नग आहे. हळदीमध्ये उटन ताज्या हळदीची प्रक्रिया करून हळद पावडर तयार केली जाते. तीळाची विक्री व तीळाच्या तेलाची विक्री ही १५ ते २० लाख रुपये प्रती वर्ष राहते.

२०२० मध्ये एफपीओ ने पाथियूर शेतकऱ्यांच्या ब्रँडवर लक्ष केंद्रित केले आहे. या ब्रँडच्या नावाखाली विकली जाणारी उत्पादने आहेत.



सेसम पीक उत्पादन



महिला गटांनी त्यांच्या गरजा व स्थानिक परिस्थितीला अनुकूल अशा पिकांच्या वाणांची निवड करण्याची स्वतःची क्षमता विकसित केला

व्हॅर्जिन नारळ तेल (व्हीसीओ). हळद ते हळद पावडर, तीळ ते तीळाचे तेल, गायीचे शेण व वाळलेले शेण आणि सेंद्रिय टाकाऊ पदार्थांपासून तयार झालेले गांडुळ खत, देशी गायीचे लोणी व तूप. एफपीओ अंतर्गत ही उत्पादने, लागवड साहित्य, शेणखत इतर जैव निविष्ठा, गांडूळ खत इत्यादींच्या खरेदी आणि विक्रीसाठी ग्रामीण 'अँग्रीमार्ट' उघडण्यात आले होते. कोविड महामारी दरम्यान कॉलवर शेतमालाची खरेदी करण्यासाठी आणि मागणीनुसार घरपोच डिलीव्हरी करण्यासाठी लहान प्रमाणात मदत सुरू करू शकते.

याद्वारे महत्त्वाचे धडे म्हणजे मूल्यवर्धन साध्या पद्धतीद्वारे, सहकार्य, समन्वय आणि एकत्रीकरण आणि समुदायांच्या सर्वसमावेशकते द्वारे साध्य करता येते आणि एक महत्त्वाची संशोधन संस्था ही सामाजिक नावीन्यपूर्ण कल्पना कशी वाढवू शकते. या काळात समोर येणारी प्रमुख आव्हाने आहेत. कुशल नारळांच्या झाडांवर चढणारे, कोविड काळात येण्याजाण्यावरील निर्बंध, हवामान बदलामुळे अवकाळी अतिवृष्टी, सामाजिक आर्थिक बदल ज्यामुळे भातशेतीच्या जमिनीचे घरबांधणीसाठी वेगाने होणारे रूपांतर ज्यामुळे निर्माण झालेल्या पाण्याच्या निचऱ्याची समस्या आणि जमिनीचे लहान तुकड्यात रूपांतर. तथापी कोविडच्या काळामध्ये शेतीतील उपक्रमांचा हस्तक्षेप हा एक आशेचा किरण राहिला. ज्याने सक्रिय शेती, मोबाइलद्वारे सतत सक्रिय संवाद साधला आणि उत्पन्न निर्माण केले.

Anithakumari P
Principal Scientist (Agri.Extn.)
ICAR Central Plantation Crops Research Institute (CPCRI)
Kayamkulam, Kerala 690533
Email : anithacpcri@gmail.com

मराठी अनुवाद : लक्ष्मीकांत पडोळे

Source : Value addition Making small farms smarter
Leisa India - June 2021